मंत्रालय.शिक्षण विभाग, शिक्षण सह संचालनालय, रोजगार व स्वयं रोजगार विभाग, व्यवसाय मार्गदर्शन विभाग, राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद (एन.सी.टी.) यु.जी.सी., राष्ट्रीय पुर्नवास परिषद (आर.सी.आय.) इत्यादी.

४) **शैक्षणिक** उद्योगशीलता - उद्योजकाचे घरी ऋद्धिसिद्धी पाणी भरी, अन जय विजय पाहरेकरी. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे जगभर शिक्षण क्षेत्रात यंत्रयुगाला अनुरुप असा अध्ययन-अध्यापनाच्या बहुमाध्यम उपयोगामुळे ज्ञान कौशल्याच्या कक्षा विस्तारल्या आहेत. अध्यापक शिक्षणाचे वर्गीय स्वरूप जाऊन सर्व समाज सतत उद्योगी राहण्याची गरज निर्माण झाली आहे. यातून शैक्षणिक उद्योगशीलतेची कल्पना उदयास आली. जगभरात संगणक, इंटरनेट, भ्रमणध्वनी, वृत्तपत्रे, नियतकालिके, मासिके, आकाशवाणी, दूरचित्रवाणी इत्यादी क्षेत्रात छात्राध्यापकांनी डी.एल.एड्., बी.एड्, एम.एड्, डी.टी.एड् नंतर व्यवसाय-उद्योग उभारावेत.

४.१) शैक्षणिक पत्रकारिता
४.२) शैक्षणिक संहिता लेखक
४.३) शैक्षणिक साहित्य निर्माता
४.४) शैक्षणिक पुस्तके, पाठ्यपुस्तके, स्टेशनरी विक्रेता
४.५) शैक्षणिक व क्रीडा साहित्य विक्रेता.
४.६) शैक्षणिक साहित्य दुरुस्ती व देखभाल
४.७) शैक्षणिक वाचनालय, अभ्यासिका संचालक
४.८) शैक्षणिक गणवेश निर्माता व विक्रेता
४.९) शैक्षणिक सहली, शैक्षणिक पर्यटन संयोजक
४.१०) शैक्षणिक संमंत्रक/सल्लागार/समुपदेशक
४.११) शैक्षणिक जाहिराती अभियोक्ता (एजंट)
४.१२) शैक्षणिक मासिक, नियतकालिक संपादक
४.१३), शैक्षणिक दिवाळी अंक संपादक
४.१३) विविध स्पर्धा परीक्षांची आवेदनपत्रे भरणेबाबतची सुविधा व मार्गदर्शक सल्लागार
४.१४) ट्यूशन (खासगी शिकवणी) वर्गाचा संचालक
४.१५) कौटुंबिक मानसिक समुपदेशक
४.१६) प्रतिथयश लेखकांचा लेखनिक
४.१७) सांस्कृतिक कार्यक्रम संयोजक व निवेदक
४.१८) विविध शालेय स्पर्धांचा संयोजक
४.१९) शैक्षणिक गीत, सी.डी. इ.चा निर्माता व वितरक
४.२०) प्रश्नपेढी निर्माता व वितरक
४.२१) पाठ्यपुस्तक, गाईड, मार्गदर्शिका, हस्तपुस्तिका लेखक
४.२२) शिक्षण साहित्य, विज्ञान प्रयोगशाळा साहित्य कार्यानुभव साहित्य निर्मिती व विक्री करणारा.
४.२३) बालवाडी, पाळणाघर, अंगणवाडी खेळघर इ.चा संचालक
४.२४) वसतिगृह चालक
४.२५) विद्यार्थी खानावळ चालक, (मेस)
४.२६) जेष्ठ नागरिकांचा सांगाती
४.२७) शालेय विद्यार्थ्यांना वाहनातून शाळेत-घरी सोडणारा अभियोक्ता (एजंट)
४.२८) बचत गटाचा प्रेरक-प्रेरिका, सल्लागार
४.२९) जुन्या व नवीन पाठ्यपुस्तकांचा विक्रेता
४.३०) भाषातरकार, दुभाषी इ.

वरील सर्व उद्योगी उपक्रम आपण निरंतर केल्यास आपल्यातील उद्योजकता जागृती होऊन 'अंत्त दीप भव,' या तथागतांच्या तत्त्वाप्रमाणे आपला मार्ग आपणास सापडेल. विपणनाचे धोरण, कार्यक्रमप्रणाली व व्यूव्हरचना आपण आपल्या स्वानुभवातून व ज्येष्ठतज्ज्ञांच्या मार्गदर्शनानुसार करावी. ग्राहक तक्रारीचे, आक्षेपांचे वेळीच तत्पर निरसन केल्यास ग्राहक समाधानी होतो. ती तक्रार एकट्याची नसून सर्वांची असते हे ध्यानात घ्यावे, सकलांचे मंगल होवो. ज्ञान-कौशल्ये प्रभावे, शैक्षणिक उद्योगशीलता होवो. ज्ञानगंगा घरोघरी.(प्रभावे बेकारी मुक्त समाज होवो.)

**संदर्भ सूची** - १) सप्रे नीलिमा व इतर गतिमान शिक्षणासाठी विचार प्रवाह (२००९) फडके प्रकाशन.
२) पाईकराव विजयकुमार (संपा) संवादपत्रिका माहे (ऑक्टो. २०१०) यचममुदि प्रकाशन नाशिक.
३) कुलकर्णी लीला उद्योग क्षेत्राचे आर्थिक सिद्धांत (२००२) यचममुदि प्रकाशन नाशिक.
४) चापरकर दीपक ग्राहक समाधान (२००२) यचममुदि नाशिक.

# शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील सेवेच्या सुसंधी

- प्रा.विजयकुमार पाईकराव, नाशिक, ९४०३७७४५२९

खरेतर शिक्षणशास्त्र विद्याशाखा ही सामाजिक शास्त्राचाच भाग आहे. मात्र सध्याची शैक्षणिक व्यवस्था, ज्ञान विज्ञानाची प्रक्रिया, अभ्यासक्रम, पाठ्यक्रम, शिक्षणक्रम इत्यादीचा प्रचंड अवाढव्य आवाका लक्षात घेता ह्या शाखेस स्वतंत्र विद्याशाखेचा दर्जा सर्वच विद्यापीठे व उच्च शैक्षणिक संस्थामध्ये प्राप्त झालेला आहे.

ज्ञान, विज्ञान, कौशल्य, सदाचार, स्वावलंबन, आत्मविश्वास, कर्तृत्त्व, शिस्त, सातत्य, देशप्रेम, निर्णयक्षमता, विनम्रता, दूरदृष्टी, कार्यकुशलता मूल्यमापन व अध्ययन-अध्यापन कौशल्याच्या सुसंस्कारासाठी शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील पुढील शिक्षणक्रम अत्यंत उपयुक्त आहेत. हे सर्व शिक्षणक्रम प्रात्यक्षिक ज्ञान कौशल्याधिष्ठित आहेत. बहुतांश विद्यापीठात व शैक्षणिक संस्था, महाविद्यालये व अभ्यासकेंद्रामध्ये अभ्यासता येतात. यात शिक्षण व शारीरिक शिक्षणाचा समावेश होतो.

**शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील विविध शिक्षणक्रम :-**

डी.एड्, डी.टी.एड्, बी.एड्, बी.एड् (विशेष शिक्षण), बी.एड् (शारीरिक शिक्षण), बी.ए.बी.एड्, बी.एस्सी.बी.एड्, बी.पी.एड्, बी.पी.ई., एम.एड्, एम.पी.एड्, डी.एस.एम., बालसंगोपन व रंजन शिक्षण प्रमाणपत्र व पदवी, बालसेविका प्रमाणपत्र, बाल शिक्षण पदविका, डी.ई.एम ए.टी.डी., ए.एम., सी.टी.सी, शालेय व्यवहारासाठी संगणक शिक्षण प्रमाणपत्र, एम.ए. (शिक्षणशास्त्र), बी.ए.(शिक्षणशास्त्र), शैक्षणिक वसतिगृह व्यवस्थापन प्रमाणपत्र व पदविका अभ्यासकेंद्र साहाय्यक प्रमाणपत्र, संमंत्रण तंत्र व मंत्र प्रमाणपत्र इत्यादी, पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी आणि शिक्षण व शारीरिक शिक्षणातील एम.फिल. व पीएच.डी. शिक्षणक्रमांचा समावेश या विद्याशाखेत होतो. हे अध्ययन पारंपारिक फेस टू फेस पद्धती, मुक्त व दूरशिक्षण पद्धती, पत्रद्वारा शिक्षण पद्धती इ.द्वारे आपणास घेता येते.

**शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील अभ्यासानंतर उपलब्ध सेवा, व्यवसायाच्या सुसंधी :-**

**१) अध्यापक** - पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक उच्च माध्यमिक शाळेत विषयवार अध्यापक/शिक्षक म्हणून कार्यानंदाची सुसंधी मिळते. शिक्षक ह्य अत्यंत प्रतिष्ठेचा व कर्तव्याचा आदराचा व्यवसाय होय.

**२) प्राध्यापक** - अध्यापक विद्यालये, महाविद्यालये विद्यापीठे व शैक्षणिक संस्था/केंद्रामध्ये अध्ययन अध्यापन व संशोधनाचा कार्यानंद प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापक इत्यादी पदावर करता येतो.

**३) अन्य संस्थातील संधी** - महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणमंडळ, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, शासकीय परीक्षा मंडळ, राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद(NCERT), महाराष्ट्र राज्य शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शिक्षण व्यवस्थापन व प्रशासन संस्था (मिपा), राष्ट्रीय शिक्षण व्यवस्थापन व प्रशासन संस्था (नीपा), महाराष्ट्र राज्य शिक्षण व प्रशासन सेवा (वर्ग १ व वर्ग २), दृक-श्राव्य संस्था, सांस्कृतिक संचालनालय, विद्या प्रबोधिनी, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डायट), राज्य शिक्षण विभाग, केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालय, समाज विज्ञान शिक्षण संस्था, राष्ट्रीय मुक्त विद्यालय संस्थान, विविध विद्यापीठातील शिक्षणशास्त्र व शैक्षणिक विभाग, मूल्यमापन विभाग, महिला व बालकल्याण विभाग, शैक्षणिक संशोधन संस्था, मुक्त विद्यापीठे, शिक्षण संचालनालय, केंद्रीय मनुष्यबळ